**ठळक बातम्या**

- सायबर सुरक्षा हा विषय केवळ डिजिटल व्यवहारांपुरता सीमित राहिला नसून देशाच्या संरक्षण यंत्रणेचा अविभाज्य घटक बनल्याचं केंद्रीय गृहमंत्र्यांचं प्रतिपादन

- आय फोर सी म्हणजेच भारतीय सायबर अपराध प्रतिबंधक समन्वय केंद्राच्या चार नवीन यंत्रणांचं केंद्रीय गृहमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

- वाहनांच्या सुट्या भागांची निर्यात २०३० पर्यंत १०० अब्ज डॉलर्सच्या निर्यातीचं उद्दिष्ट गाठेल असा केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्र्यांना विश्वास

- भारताच्या सेमी कंडक्टर मिशनमध्ये सहभागासाठी अमेरिका उत्सुक

**आणि**

- संयुक्त राष्ट्रांचं स्थायी सदस्यत्व आफ्रिकेच्या सहभागासह अधिक प्रातिनिधिक बनवण्याचं भारताचं आवाहन

**<><><><><>**

सायबर सुरक्षा हा विषय केवळ डिजिटल व्यवहारांपुरता सीमित राहिला नसून देशाच्या संरक्षण यंत्रणेचा अविभाज्य घटक बनल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. आय फोर सी म्हणजेच भारतीय सायबर अपराध प्रतिबंधक समन्वय केंद्राच्या पहिल्या वर्धापन दिन सोहळ्यात आज

नवी दिल्ली इथं ते बोलत होते. जगातल्या एकूण डिजिटल व्यवहारांपैकी जवळजवळ निम्मे व्यवहार भारतात होतात,त्यामुळे भारतात सायबर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी अधिकाधिक आधुनिक तंत्रज्ञान आवश्यक असल्याचं ते म्हणाले. सायबर गुन्ह्यांविषयीच्या माहितीचं सर्वसमावेशक संकलन करण्यासाठी समन्वय या मंचाचं तसंच संशयित बाबींची नोंद करणाऱ्या सस्पेक्ट रजिस्ट्रीचं उद्घाटन त्यांनी केलं. या मंचावरची माहिती सर्व चौकशी यंत्रणांना उपलब्ध असेल. सायबर फ्रॉड मिटिगेशन सेंटरचं लोकार्पणही शहा यांनी या कार्यक्रमात केलं. सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांमधल्या पोलिसांना सायबर गुन्हेगारीविषयी माहिती आणि उपाययोजनांचं प्रशिक्षम देणाऱ्या सायबर कमांडो कार्यक्रमाचा प्रारंभ त्यांनी केला. सायबर गुन्हेगारी आणि त्यापासून बचावाचे उपाय याविषयी जनजागृती करण्यासाठी आय फोर सी मार्फत विशेष कार्यक्रम राबवण्यात येणार आहे. देशभरातल्या ७२ दूरचित्रवाहिन्या, चित्रपटगृहं आणि इतर माध्यमातून जनतेपर्यंत ही माहिती पोहचवली जाणार आहे. सायबर सुरक्षेसाठी १९३० हा दूरध्वनी मदत क्रमांक आय फोरसीनं उपलब्ध करुन दिला आहे. या जनजागृती मोहिमेत सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांनी सहभाग घ्यावा असं आवाहन शहा यांनी केलं.

<><><><><>

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची संसदीय राजभाषा समितीच्या अध्यक्षपदी एकमतानं फेरनिवड झाली आहे. नव्या सरकारच्या स्थापनेनंतर राजभाषा संसदीय समितीची पुनर्रचना करण्यासाठी काल नवी दिल्लीत

समितीची बैठक झाली. त्यात ही निवड करण्यात आली. सर्व सरकारी यंत्रणांमध्ये २०४७ पर्यंत भारतीय भाषांचा वापर केला जाण्याच्या उद्दिष्टाच्या दिशेनं सरकार वाटचाल करत असल्याचं शहा यांनी या निवडीनंतर सांगितलं. अमित शहा यांनी २०१९ ते २०२४ या कालावधीत समितीचे अध्यक्ष म्हणून काम पाहिलं होतं. राजभाषा विभाग एक सॉफ्टवेअर विकसित करत असून, त्याआधारे आठव्या सूचीतल्या सर्व भाषा स्वयंचलितपणे अनुवादित केल्या जातील, असंही शहा यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><><>**

देशातून होणारी वाहनांच्या सुट्या भागांची निर्यात २०३० पर्यंत १०० अब्ज डॉलर्सच्या निर्यातीचं उद्दिष्ट गाठेल असा विश्वास केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी व्यक्त केला आहे. ते काल नवी दिल्ली इथं वाहनांच्या सुट्या भागांची निर्मिती करणाऱ्या उद्योग संघटनेच्या ६४ व्या वार्षिक अधिवेशनात बोलत होते. मेक इन इंडिया उपक्रमासाठी आणि वाहन उत्पादन उद्योगासाठी जागतिक वन-स्टॉप सोल्यूशन बनवण्यास मदत केल्याबद्दल त्यांनी या उद्योजकांचं कौतुक केलं. देशाला २०४७ पर्यंत विकसित देशांच्या यादीत नेण्यासाठी सरकार कटिबद्ध आहे यावर त्यांनी भर दिला आणि सामूहिक बांधिलकीच्या बळावर देशाच्या विकासाचा आलेख वरच्या दिशेने जाईल, असा विश्वासही व्यक्त केला. इलेक्ट्रॉनिक्स आणि वाहन उद्योगामध्ये सरकारनं सुरू केलेल्या उत्पादन-संबंधित प्रोत्साहन

योजना अधिक चांगली कामगिरी करत आहेत, असं यावेळी केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग राज्यमंत्री जितिन प्रसाद यांनी सांगितलं.

**<><><><><>**

नागरी विमान वाहतूकविषयक दुसऱ्या आशिया-प्रशांत महासागर मंत्रीस्तरीय परिषदेचं आयोजन नवी दिल्ली इथं ११ आणि १२ सप्टेंबर रोजी करण्यात आलं आहे. नागरी विमान वाहतूक मंत्री किंजरापू राममोहन नायडू यांनी काल नवी दिल्लीत प्रसारमाध्यमांना ही माहिती दिली. देशांतर्गत विमान वाहतुकीत शाश्वत वाढ करण्याचं सरकारचं उद्दिष्ट आहे. विमानांची देखभाल, दुरुस्ती सेवा, मालवाहतूक क्षेत्रात भारत स्वतःला एक प्रमुख केंद्र म्हणून प्रस्थापित करत असून, जागतिक स्तरावर तिसऱ्या क्रमांकाची देशांतर्गत विमान वाहतूक बाजारपेठ म्हणून विकसित होत आहे, असंही त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

एम्स् अर्थात ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस या संस्थेनं आज नवी दिल्ली इथं TCC म्हणजेच 'तंबाखू निवारण केंद्राचं' उदघाटन केलं. TCC हा NDDTC अर्थात राष्ट्रीय औषध व्यसन उपचार केंद्र आणि एम्स् चा पल्मोनरी, क्रिटिकल आणि स्लिप मेडिसिन विभाग यांच्यातल्या समन्वयातून उपक्रम सुरु करण्यात आला आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून,

रुग्णांना तंबाखूच्या सेवनामुळे होणाऱ्या घातक परिणामांबाबत वैद्यकीय तज्ज्ञांकडून समुपदेशन केलं जाणार आहे.

**<><><><><>**

श्रोते हो, पुण्यातून सुरू झालेला सार्वजनिक गणेशोत्सव आता आंतरराष्ट्रीय झाला आहे. विविध देशात गणेशोत्सव कशा रीतीने साजरा होतो हे आपण तिथे राहणाऱ्या नागरिकांकडून जाणून घेणार आहोत. आकाशवाणी मुंबईवरून रात्री ८ वाजून ५ मिनिटांनी प्रसारित होणाऱ्या राष्ट्रीय बातम्यांमध्ये, दररोज. तेव्हा ऐकायला विसरू नका, आंतरराष्ट्रीय गणेशोत्सव आकाशवाणीवर.

**<><><><><>**

भारताच्या सेमी कंडक्टर मिशनमध्ये सहभागी होण्यासाठी आपण उत्सुक असल्याचं अमेरिकेच्या परराष्ट्र विभागानं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे. अधिक लवचिक, सुरक्षित आणि शाश्वत जागतिक सेमीकंडक्टर मूल्य साखळी निर्माण करण्यासाठी ही भागीदारी उपयोगी ठरेल असं यात म्हटलं आहे.  चिप्स कायदा २०२२ अनुसार,  आंतरराष्ट्रीय तंत्रज्ञान सुरक्षा आणि नवोन्मेष निधी अंतर्गत  जागतिक सेमीकंडक्टर परिसंस्थेचा विकास करून त्यामध्ये विविधता आणण्याच्या संधी शोधण्यासाठी आपण उत्सुक असल्याचं यात म्हटलं आहे.

भारत अमेरिका दरम्यानचा हा सहयोग, भारताच्या सेमीकंडक्टर उद्योगाचा विस्तार करून दोन्ही देशांना  त्याचा लाभ देण्यात महत्वाची भूमिका बजावेल.

**<><><><><>**

गाझा पट्टीचा दक्षिणेकडचा भाग आणि मानवतावादी क्षेत्र म्हणून निर्धारित करण्यात आलेल्या प्रदेशात इस्त्राएलनं केलेल्या हल्ल्यात किमान ४० नागरिकांचा मृत्यू झाला असून, ६० पेक्षा जास्त नागरिक जखमी झाले आहेत, तर अनेक जण ढिगाऱ्याखाली अडकले आहेत, असं हमास या संघटनेच्या नागरी संरक्षण विभागानं जारी केलेल्या पत्रकात म्हटलं आहे. तर, खान युनिस भागात हमास या अतिरेकी संघटनेच्या केंद्रावर आपल्या वायुदलानं हल्ला केला असून, स्थानिक नागरिकांचा त्यापासून बचाव करण्यासाठी आवश्यक उपाययोजना केल्याचं इस्त्राएलच्या लष्करानं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे. इस्त्रायलनं गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये या प्रदेशात लष्करी मोहीम सुरू केल्यापासून हजारो विस्थापित पॅलेस्टिनीं नागरिकांनी खान युनिस भागात आश्रय घेतला आहे. तेव्हापासून गाझा पट्टीत ४० हजार ९०० पेक्षा जास्त नागरिक मारले गेल्याचं या प्रदेशातल्या आरोग्य मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

संयुक्त राष्ट्रांनी आपले मानवाधिकार उच्चायुक्त वोल्कर तुर्क यांच्या माध्यमातून गाझा पट्टीतला संघर्ष थांबवण्याचं आवाहन केलं आहे. या प्रदेशातला संघर्ष पूर्णपणे थांबवून शांतता प्रस्थापित करण्याची तातडीची गरज असल्याचं वोल्कर तुर्क यांनी काल संयुक्त राष्ट्र मानवाधिकार परिषदेच्या ५७ व्या सत्राच्या उद्घाटनपर निवेदनात म्हटलं आहे.

<><><><><>

भारतानं संयुक्त राष्ट्रांचं स्थायी सदस्यत्व आफ्रिकेच्या सहभागासह अधिक प्रातिनिधिक बनवण्याचं आवाहन केलं असून, सुरक्षा परिषदेतल्या राजकीय मतभेदांमुळे शांतता कार्यात बाधा येत असल्याचं अधोरेखित केलं आहे. संयुक्त राष्ट्रात भारताचे नवनियुक्त स्थायी प्रतिनिधी पी हरीश यांनी काल सुरक्षा परिषदेला पहिल्यांदाच संबोधित केलं. त्यावेळी ते बोलत होते. सुरक्षा परिषदेला, विशेषतः कायम स्वरूपी सदस्यांनी आजच्या वास्तवाचं अधिक प्रतिनिधीत्व करायला हवं, असं ते यावेळी म्हणाले. शांतता कार्यात भारताचं सर्वात मोठं योगदान राहिलं असून, गेल्या ७ दशकांमध्ये ५० पेक्षा जास्त मोहिमांमध्ये भारतानं आपले २५ लाखापेक्षा जास्त सैनिक तैनात केल्याचं त्यांनी यावेळ सांगितलं.

<><><><><>

पाकिस्तानची राजधानी इस्लामाबाद इथे काल रात्री माजी प्रधानमंत्री इमरान खान यांच्या तहरीक ए इन्साफ या पक्षाच्या काही खासदारांना पोलिसांनी अटक केली. या पक्षाचे नेते आणि कार्यकर्त्यांनी इस्लामाबादमध्ये ८ सप्टेंबर रोजी मोर्चाचं आयोजन केलं होतं. मात्र, कार्यकर्त्यांनी यावेळी वाहतुकीचे नियम मोडत सामान्यांसाठी निर्धारित असलेल्या रस्त्यावर मोर्चा नेला.

//<><><><><>//